आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शुक्रवार दिनांक 18/09/2026 | METRO CITY VRUTANT

› संपादक : रफी हुसेन › पिंपरी चिंचवड व पुणे › पान 4 › अंक 198 › RNI - MAHMAR /2021/51259 › metrocity924@gmail.com

# आमदारांचा लोगो लावून फिरणाऱ्यांना आता परवाना निलंबनाचा दणका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : मोटारीवर बेकायदेशीरपणे 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य – आमदार' तसेच अशोकस्तंभाचा लोगो लावून फिरणाऱ्या वाहनचालक आणि मालकांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. गुन्हे दाखल केल्यानंतर आता संबंधित वाहनचालकांचे वाहन परवाने निलंबित करण्याचे प्रस्ताव परिवहन विभागाकडे पाठविण्यात येणार आहेत.**

**पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांत पोलिसांना आमदार असा लोगो असलेली वाहने आढळून आली आहेत.**

**संबंधित वाहनचालक किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणीही आमदार नसतानाही फसव्या उद्देशाने आणि प्रभाव निर्माण करण्यासाठी वाहनांवर आमदाराचा लोगो लावण्यात आल्याचे पोलिसांच्या चौकशीत निष्पन्न झाले आहे.**




वाहनांवर 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य – आमदार' आणि अशोकस्तंभाचा लोगो अनधिकृतपणे वापरणाऱ्या वाहनचालक व मालकांविरोधात मागील आठवड्यात मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून, आता नियमानुसार वाहन परवाना निलंबनाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव परिवहन विभागाकडे पाठविला जाणार आहे. दरम्यान, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पोलिसांची कारवाईही सुरुच आहे. जानेवारीपासून आतापर्यंत विनाहेल्मेट वाहन चालविणे, आकर्षक नंबर प्लेट, काळ्या काचा, सायलेंसरमध्ये बदल तसेच वाहन परवाना निलंबनासंबंधी तब्बल 5 लाख 72 हजार 18 वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत वाहनचालकांकडून 63 कोटी 78 लाख 47 हजार 650 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.दरम्यान, कसपटेवस्ती, वाकड येथे गुरुवारी मोटारीवर बेकायदेशीरपणे 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य – आमदार' असा लोगो लावून फिरणाऱ्या दोघांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. दंडात्मक तसेच न्यायालयीन कारवाई टाळावी, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी केले आहे. तसेच वाहतूक कोंडी, वाहतूक नियमन किंवा वाहतुकीशी संबंधित समस्या पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी 'ट्राफिक बडी' व्हॉट्सअॅप चॅटबॉटचा वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

# बीड-पुणे रेल्वेसेवेचा शुभारंभ

## मराठवाड्याची कन्या म्हणून विशेष अभिमान – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बीड : मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधत बीडकरांसाठी आजचा दिवस अत्यंत ऐतिहासिक व आनंददायी ठरला. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या 'बीड-पुणे' थेट रेल्वेसेवेचा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. बीडच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाला मोठी चालना देणाऱ्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे आणि धानोरा रस्त्यावरील 'पंढरी' येथील विज्ञान उद्यान व तारांगण प्रकल्पाचे भूमिपूजनही पार पडले. यावेळी खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत आदी उपस्थित होते.**





बीड जिल्हा अनेक दशके रेल्वे नकाशापासून दूर असल्याने शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि नोकरदार वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून आज सुरु झालेल्या या थेट रेल्वेसेवेमुळे बीडकरांची अनेक वर्षांच्या प्रतीक्षेची पूर्तता झाली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्वप्नांना उजाळा दिला. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करताना त्यांनी रेल्वे जोडणीला नेहमीच प्राधान्य दिले होते. गेल्या वर्षी 17 सप्टेंबर 2025 रोजी बीड-अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरु करताना, पुढील वर्षी बीडकरांना थेट पुण्यापर्यंत प्रवास करता येईल, असा शब्द देण्यात आला होता. आज तोच शब्द पूर्ण करताना मराठवाड्याची कन्या म्हणून मला विशेष अभिमान वाटत आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच, येत्या काही महिन्यांत बीड ते पनवेल ही थेट रेल्वेसेवा सुरु करण्याचा मानस व्यक्त करत, बीड-परळी मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग थेट दक्षिण भारताशी जोडला जाईल आणि त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

रेल्वेच्या शुभारंभासोबतच बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ आज रोवली गेली. बीडच्या स्थानिक कलाकारांसाठी अनेक दशकांपासून हक्काचे व्यासपीठ असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी 8 कोटी 19 लाख रुपयांचा निधी प्रशासकीय पातळीवर मंजूर करण्यात आला असून, जुन्या भिंती कायम ठेवत येथे अत्याधुनिक ध्वनी व प्रकाश व्यवस्था, साउंड इकोस्टिक, सेंट्रल एसी, आरामदायी आसनव्यवस्था आणि आधुनिक ग्रीन रूम्स उभारण्यात येणार आहेत. यासोबतच, धानोरा रस्त्यावरील 'पंढरी' येथे सुमारे 28 कोटी रुपये खर्चाचे भव्य तारांगण व विज्ञान उद्यान उभारले जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत 14 कोटी रुपयांना मंजुरी मिळाली असून, या ठिकाणी विद्यार्थ्यांना मातृभाषेतून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आभासी तंत्रज्ञान आणि खगोलशास्त्राची सविस्तर माहिती उपलब्ध होणार आहे.

# उम्मीद द होप फाउंडेशनतर्फे 'आदर्श शिक्षक सन्मान सोहळा' उत्साहात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने उम्मीद द होप फाउंडेशनच्या वतीने 'आदर्श शिक्षक सन्मान सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात निःस्वार्थपणे योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.**







शिक्षक हे समाजाच्या जडणघडणीत तसेच राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देण्याबरोबरच त्यांच्यात संस्कार, मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करत असतात. त्यांच्या या योगदानाची दखल घेत फाउंडेशनच्या वतीने आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

यावेळी उम्मीद द होप फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक काशिफ फखरुल सय्यद यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याला सलाम केला.

समाज आणि शिक्षणाच्या उन्नतीसाठी उम्मीद द होप फाउंडेशन भविष्यातही सातत्याने कार्यरत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणारा हा सोहळा प्रेरणादायी ठरला. शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षकांच्या योगदानाला समाजानेही प्रोत्साहन देण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महापौरांच्या पुढाकारातून 'सेवा संकल्पा'चा दिवा

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये अनोखा उपक्रम

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांच्या पुढाकारातून महानगरपालिकेतील सफाई कर्मचारी बंधू-भगिनींसमवेत 'संकल्पाचा दिवा' प्रज्वलित करून अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त करत पिंपरी-चिंचवड शहरात 'सेवा संकल्प अभियान' व्यापक स्वरुपात राबविण्याचा निर्धार करण्यात आला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या वाढदिवसानिमित्त मिळालेल्या शुभेच्छा आणि आशीर्वाद हे देशसेवेचा संकल्प अधिक दृढ करणारे असल्याची भावना व्यक्त केली आहे. त्याच सेवाभावाला केंद्रस्थानी ठेवून महापौर रवि लांडगे यांनी शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी आणि नागरिककेंद्री बनविण्यासाठी प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत 'संकल्पाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रम राबविला.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शिक्षण समिती सभापती रविना अंघोळकर, महिला व बालकल्याण सभापती राणी पठारे, भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस मधुकर बच्चे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सफाई कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सेवा' ही केवळ संकल्पना न ठेवता ती सार्वजनिक जीवनाच्या केंद्रस्थानी आणली आहे. विकासाभिमुख प्रशासन, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न आणि देशाच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याची त्यांची भूमिका आम्हाला प्रेरणा देते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापेक्षा त्यांच्या सेवाभावातून प्रेरणा घेऊन आपल्या शहरासाठी एखादा सकारात्मक संकल्प करणे, हीच त्यांना खऱ्या अर्थाने शुभेच्छा ठरेल," असे महापौर रवि लांडगे यांनी यावेळी सांगितले.

नरेंद्र मोदी यांनी 9 जून 2024 रोजी सलग तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांच्या अधिकृत परिचयात 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' तसेच अंत्योदय आणि योजनांची अंतिम घटकापर्यंत पोहोच यांना त्यांच्या शासनदृष्टिकोनातील महत्त्वाचे घटक म्हणून नमूद करण्यात आले आहे.

शहराच्या स्वच्छतेसाठी ऊन, पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता दररोज काम करणारे सफाई कर्मचारी हे शहराच्या सेवाव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहेत. त्यामुळे 'सेवा संकल्प अभियान' सुरु करताना त्यांनाच या उपक्रमाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले. त्यांच्या समवेत प्रज्वलित करण्यात आलेला 'संकल्पाचा दिवा' हा केवळ पंतप्रधानांना दिलेल्या शुभेच्छांचे प्रतीक नसून स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि संवेदनशील जनसेवेसाठी संपूर्ण शहराने एकत्र येण्याच्या सामूहिक निर्धाराचे प्रतीक असल्याचे महापौर लांडगे यांनी स्पष्ट केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 18/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी महानगरपालिकेचा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा होणार

## विकासप्रवासाचा आढावा, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा 44 वा वर्धापन दिन विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अधिकारी-कर्मचारी केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेणे, शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणे तसेच नागरिकाभिमुख प्रशासन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.**



महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी 11 ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो. यंदा 11 ऑक्टोबर रोजी रविवार व साप्ताहिक सुट्टी असल्यामुळे मुख्य वर्धापन दिन कार्यक्रम सोमवार, दि. 12 ऑक्टोबर 2026 रोजी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी तसेच प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे. वर्धापन दिनाच्या पूर्वतयारी व नियोजनासंदर्भात महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. बैठकीस सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, प्रभाग अध्यक्ष निखील बो-हाडे, नगरसदस्य राजू मिसाळ, विकास साने, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच शशिकांत झिंजुर्डे, उमेश बांदल, मंगेश कलापुरे, चंद्रशेखर गावडे, नितीन समगीर, लाला गाडे, विश्वनाथ लांडगे, राजाराम लांडे, मदन चिंचवडे, किशोर आठवाल, अनिल लखन आणि राकेश चव्हाण आदी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराच्या गेल्या 44 वर्षांच्या विकासामध्ये महानगरपालिकेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराचा आधुनिक व विकसित शहराच्या दिशेने झालेला प्रवास हा नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून साध्य झाला आहे.

या विकासप्रवासाचा आढावा घेण्यासोबतच आगामी काळातील शहराच्या गरजा लक्षात घेऊन नागरिककेंद्रित, पारदर्शक, गतिमान आणि गुणवत्तापूर्ण प्रशासन अधिक सक्षम करण्याचा संकल्प वर्धापन दिनाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. महापौर रवि लांडगे म्हणाले, "पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा 44 वा वर्धापन दिन हा शहराच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेण्याबरोबरच या प्रवासात योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाच्या कार्याची दखल घेण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे. नागरिकांचा सहभाग, लोकप्रतिनिधींचे सहकार्य आणि महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून शहराच्या विकासाला सातत्याने गती मिळाली आहे. आगामी काळात शहराच्या वाढत्या गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन अधिक सक्षम, गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख प्रशासन देण्यास प्राधान्य राहील. वर्धापन दिनाच्या निमित्ताने अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासोबतच विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांमधून त्यांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे." वर्धापन दिनानिमित्त नगरीचे शिल्पकार अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यासोबत रक्तदान शिबिर, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष उपक्रम, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी चहापान व अल्पोपहार, कर्मचारी ऑर्केस्ट्रा, गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव आदी कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे.

# आकुर्डीत भरधाव वाहनाची धडक; तरुणाचा मृत्यू

## दुचाकीला धडक देत रस्त्याच्या कडेला उभ्या व्यक्तीलाही उडवले; उपचारादरम्यान मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चिंचवड : भरधाव वेगाने वाहन चालवत दुचाकीला धडक दिल्यानंतर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या व्यक्तीलाही जोरदार धडक देण्यात आली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या महादेव शिवपुत्र गवाडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळील वाल्हेकरवाडी परिसरात 14 सप्टेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली.

या प्रकरणी गणेश राजेंद्र तनपुरे (वय 48) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चिंचवड पोलीस ठाण्यात दिनेश अशोक धोरे (वय 34, रा. वडगाव मावळ) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी वाहन भरधाव वेगाने चालवत होता.

वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि दुचाकीला तसेच रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या व्यक्तीला धडक बसली.

या अपघातात महादेव गवाडे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर चिंचवड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 18/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'बालभारती'च्या ६० वर्षांच्या शैक्षणिक प्रवासाचा पुणे फेस्टिव्हलकडून गौरव

## संचालिका अनुराधा ओक यांचा सन्मान; वाचनसंस्कृती रुजविण्यावर भर देण्याचे आवाहन

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**"कोठारी आयोगाने प्रत्येक राज्यात स्वतंत्र पाठ्यपुस्तक निर्मिती संस्था असावी, अशी शिफारस केली होती. त्यानंतर बालभारतीचा प्रवास सुरु झाला आणि आज संस्थेने 60 वर्षांचा यशस्वी टप्पा पूर्ण केला आहे." बालभारतीकडून मोठ्या प्रमाणावर विविध 10 भाषांमध्ये 10 कोटींहून अधिक पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाते. यंदा एकाच वर्षात चार इयत्तांची पुस्तके प्रकाशित करण्याचे ऐतिहासिक काम संस्थेने केले आहे. आधुनिक माध्यमांचा वापर करून पुस्तकांचे प्रभावीपणे प्रसार व वितरण करण्यावरही भर दिला जात आहे. हीरक महोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील 66 हजार शाळांमधील विद्यार्थ्यांना सहा पुस्तकांचे संच देण्यात आल्याचे बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांनी सांगितले. पुणे फेस्टिव्हल तर्फे 'बालभारती'च्या 60 वर्षपूर्तीनिमित्त करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी त्या बोलत होत्या.**



महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत गेली सहा दशके महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात 'बालभारती'च्या 60 वर्षांच्या कार्याचा पुणे फेस्टिव्हलतर्फे गौरव करण्यात आला. बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांचा पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते गुरुवारी सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार, जनरल सेक्रेटरी व सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू उपस्थित होते.

अनुराधा ओक पुढे म्हणाल्या की "आज मुलांचा स्क्रीन टाइम वाढत असून वाचनाची आवड कमी होत आहे. त्यामुळे मुलांना पुन्हा वाचनसंस्कृतीकडे वळविण्याची गरज आहे. मुल हे आमचे दैवत आहे. 'किशोर' मासिक तोट्यात असले तरी ते कमीत कमी दरात मुलांपर्यंत पोहोचवून त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. किशोर आणि बालभारती आता एकरूप झाले आहेत. पाठ्यपुस्तक निर्मितीबरोबरच वाचनसंस्कृती रुजविण्याचे कामही बालभारती करीत आहे," असे त्यांनी नमूद केले. बालभारतीची मोक्याच्या ठिकाणी असलेली जागा जतन करण्यासाठी पुणेकरांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

बालभारती'ची स्थापना 27 जानेवारी 1967 रोजी झाली. मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, कन्नड, तेलुगू, सिंधी, गुजराती अशा विविध भाषांमध्ये शालेय पाठ्यपुस्तकांची निर्मिती व वितरण करण्याचे काम संस्थेमार्फत केले जाते. असे सांगून त्या म्हणाल्या की, 'राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा अविभाज्य भाग बनलेल्या या संस्थेच्या कार्याचा गौरव पुणे फेस्टिव्हल तर्फे करण्यात आला याचा आनंद आहे.

कृष्णकुमार गोयल म्हणाले, "पुणे फेस्टिव्हल केवळ कला-संस्कृती जोपासण्याचे काम करीत नाही, तर कर्तृत्ववान व्यक्ती आणि संस्थांचाही गौरव करतो. बालभारती ही पुण्याची आणि महाराष्ट्राची महत्त्वाची संस्था आहे. राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक वाटचालीत तिचे योगदान मोठे आहे. आजचा सन्मान केवळ संचालिकेचा नसून बालभारतीतील आजवरच्या सर्व कर्मचारी आणि त्यांच्या अथक परिश्रमांचा आहे. संस्कृती जपायची असेल तर शिक्षण जपावे लागेल आणि शिक्षणाबद्दल अभिमान बाळगावा लागेल."

उल्हास पवार यांनी बालभारतीच्या कार्याचे कौतुक करताना संस्थेला शासनाने अधिक पाठबळ देण्याची गरज व्यक्त केली. "बालभारतीने अनेक भाषांमध्ये दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. साने गुरुजींच्या आंतरभारतीच्या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देणारे काम या संस्थेने केले आहे. अनेक नामवंत लेखक, कवी आणि साहित्यिक बालभारतीशी जोडले गेले आहेत. 'पसायदान'चा उर्दू अनुवादही संस्थेने प्रसिद्ध केला आहे. ग्रामीण भागापर्यंत पुस्तके पोहोचविण्याची वितरण यंत्रणाही तितकीच महत्त्वाची आहे. लहानपणापासून विद्यार्थ्यांची सामाजिक व शैक्षणिक जडणघडण करण्याचे मोठे काम बालभारतीने केले आहे," असे पवार म्हणाले यावेळी 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांचा पुणे फेस्टिव्हलतर्फे, तर उल्हास पवार यांचा बालभारतीतर्फे सन्मान करण्यात आला. बालभारतीतील कर्मचारीवर्गाच्या कमतरतेबाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन विश्वस्त मोहन टिल्लू यांनी दिले. कार्यक्रमाच्या प्रारंभी तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांनी हंसध्वनी रागातील 'वातापी गणपती' हे गणेशस्तवन सादर केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सचिन आडेकर यांनी केले.

# पुणे फेस्टिव्हलमधील सुलेखन प्रदर्शनाला मोठा प्रतिसाद

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : महाराष्ट्रातील 50 हून अधिक सुलेखनकारांच्या 300 हून अधिक सुंदर अक्षरातील कलाकृतींचे प्रदर्शन पुणे फेस्टिव्हल अंतर्गत बालगंधर्व कलादालनात गुरुवार दि. 17 सप्टेंबर रोजी सकाळी 10.00 ते रात्री 8.00 या वेळेत संपन्न झाले. त्यास पुणेकर आणि शाळकरी विद्यार्थांनी फार मोठा प्रतिसाद दिला. अक्षरनंद कॅलीग्राफीच्या वतीने आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुणे महानगरपालिकेच्या उपायुक्त वसुंधरा बारवे, संथेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, प्रमोद उमरदंड, सचिन आडेकर अनेक चित्रकला शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी रमणबाग आणि मॉडर्न हायस्कूल या दोन शाळांमधील 500 हून अधिक विद्यार्थ्यांना सुलेखनाची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. 'सुलेखन ही कला असून प्रत्येकाचेच अक्षर सुंदर आणि वळणदार असावे. त्यासाठी शाळकरी वयातच विद्यार्थ्यांना सुलेखनाचे प्रशिक्षण द्यावे असे कृष्णकुमार म्हणाले'.

यामध्ये 12x 18 इंच आकारात मराठीतील रंगीत सुलेखन कलाकृती सादर झाल्या. तसेच अनेक प्रात्यक्षिके देखील सादर केली गेली.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968